# कोव्हिड १९ या महामारीमुळे युवावर्गाच्या शिक्षणात आलेल्या अडचणी दूर करण्यात ई-स्त्रोतांची भूमिका

**मुग्धा मनिष राजनकर**
सहायक प्राध्यापक
ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग
कमला नेहरु महाविद्यालय, नागपूर
9423688848

---

**सारांश –**

प्रस्तुत संशोधन लेखातंर्गत कोव्हिड १९ या महामारीमुळे युवावर्गाच्या शिक्षणावर जो वाईट परिणाम झाला व त्यामुळे त्यांना शिक्षण घेण्यात ज्या अडचणी आल्या त्या दुर होण्याच्या दृष्टीने माहिती तंत्रज्ञानामुळे जी दालने उपलब्ध झाली आहे त्यासंदर्भात चर्चा करण्यात आली आहे.

**प्रस्तावना -**

२०१९ वर्षाचा अखेर , सर्वांना नवीन वर्षाची चाहूल लागलेली आणि त्यातच वर्षाचा शेवटचा दिवस आणि त्या दिवशी संपूर्ण देशाला अशा एका महामारीने आपल्या अवाक्यात कधी घेतले कळलेच नाही. या महामारीचे नाव कोव्हिड १९ होय. हळूहळू या महामारीचे सावट संपूर्ण देशावर पडू लागले आणि त्याचा सामना करण्यास सर्व यंत्रणा पुढे येऊ लागल्या. या आजारावर उपाय म्हणून लॉकडाऊन करण्यात आले. सर्व नागरिकांना सामाजिक अंतर ठेवण्याचे सरकारी आदेश काढण्यात आले, तसेच सर्वांना कुठेही वावरतांना तोंडावर मास्क लावणे सक्तीचे केले, जेणेकरुन या आजारास कोणी बळी पडणार नाही. या सर्व परिस्थितीचा परिणाम सर्वच क्षेत्रावर पडला. शिक्षण क्षेत्र देखील यातून सुटले नाही.

आजचा युवावर्ग जो समाजाचा भविष्याचा आधार आहे अशा युवावर्गाच्या शिक्षणावर खुप जास्त प्रंमाणात परिंमाण झाला. सरकारी आदेशामुळे सर्वत्र महाविद्यालय बंद ठेवण्यात आले. विद्यापीठांना परीक्षा घेण्याचे बंधन असल्याने त्यांना अशा परिस्थितीत परीक्षा कशी पार पाडावी, असे अनेक प्रश्न शैक्षणिक क्षेत्रात उपस्थित होऊ लागले. एकीकडे महाविद्यालये बंद तर दुसरीकडे विद्यापीठाद्वारे परीक्षेचे वेळापत्रक जाहिर होऊ लागले अशा वेळी शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांपुढे अभ्यास करावा तर कसा, महाविद्यालयात प्रवेश देखील बंद करण्यात आलेला होता. परीक्षेला आवश्यक असलेले वाचन साहित्य मिळवायचे तरी कसे, कारण ग्रंथालयातील प्रवेश बंद करण्यात आला. अशा अनेक अडचणीचा सामना आज युवा वर्ग करित आहे. या आजारावर हळूहळू औषोधपचार होऊ लागले व त्याचा परिणाम समाजामध्ये या आजारामुळे जी दहशत निर्माण झाली होती ती दूर होण्यास मदत होऊ लागली. काही प्रमाणात महाविद्यालय सुरु ठेवण्याचे आदेश सरकार कडून देण्यात आले. मात्र अजूनही शिक्षण ऑनलाईन पध्दतीनेच देणे सुरु ठेवण्यात आले आहे. ऑनलाईन शिक्षणाचे चांगले वाईट असे दोन्ही परिणाम युवा वर्गाच्या शिक्षणावर झालेले आहे.

चांगल्या परिणामाचा विचार केला असता आपल्या लक्षात येईल की, आजपर्यंत माहिती तंत्रज्ञानाची जी विविध तंत्रे उपस्थित होती तिचा हवा तसा सकारात्मक परिणाम शिक्षणावर झालेला दिसून आलेला नाही. पण या महामारीमुळे जी परिस्थिती निर्माण झाली त्यामुळे नकळत वेगवेगळया तंत्रज्ञानाचा वापर करण्यास सुरूवात झाली. त्यामुळे शिक्षणामध्ये अध्ययन अध्यापन या प्रक्रियेतील ब-याच अडचणी दूर होण्यास मदत झाली. त्या निमित्ताने माहिती तंत्रज्ञान कसे हाताळायचे याचे ज्ञान अवगत करु लागले. शिक्षक विद्यार्थी यांच्यात प्रत्यक्ष संपर्क स्थापीत होत नसले तरी ते सतत ऑनलाईनच्या माध्यमातून जोडून होते. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाविषयी ज्या काही अडचणी उद्भवायच्या त्या सर्व आडचणीचे निराकरण ईलक्टॉनिक साधनांच्या साहाय्याने सोडविण्यास शिक्षणगण सुसज्ज झाले. विविध सामाजिक माध्यमांचा वापर सर्वत्र वाढू लागला. जसे व्हाट्सआप, फ़ेसबुक, तसेच ऑनलाईन वेबीनार, ऑनलाईन पध्दतीने प्रश्नमंजुषा आयोजीत करणे, ऑनलाईन पध्दतीने गटागटामध्ये चर्चा घडवून आणणे. अशा विविध मार्गाने शिक्षण क्षेत्रात शैक्षणिक कार्य सुरळीत पार पाडले जावे याकडे सर्वांचेच लक्ष केंदित होत होते व त्याचा परिणाम युवा वर्गाच्या शिक्षणावर झाला.

दुस-या बाजूने विचार करता विद्यापीठ स्तरावर घेण्यात येणा-या परीक्षा या ऑनलाईन पध्दतीने तर काही परीक्षा घेण्याची जबाबदारी महाविद्यालयाला देण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासोबतच परीक्षा देणे सक्तीचे झाले. काही परीक्षा स्पर्धा परीक्षा म्हणून घेतल्या जात होत्या, अशा परीक्षेला मात्र परीक्षार्थी आणि परीक्षा केंद्र यांना ब-याच अडचणीचा सामना करावा लागला. वारंवार परीक्षा पुढे पुढे ढकलण्यात येत होत्या. त्याचा परिणाम युवा वर्गात नैराश्य येऊ लागले. नोकरीचा प्रश्न मोठ्या प्रमाणात भेडसावू लागला. युवा वर्गातील ब-याच व्यक्तिंच्या लागलेल्या नोक-या सुटल्या, कारण सर्वत्र लॉकडाऊन, संचारबंदी मुळे आर्थिक अडचणी भरपूर येऊ लागल्या, याचा परिणाम शैक्षणिक संस्थेवर देखील झाला व त्यात कंत्राटी प्रक्रियेतून लागलेल्या शिक्षकांना नोकरीवरुन कमी करण्यात आले.

समाजशास्त्र हे एक आधुनिक शास्त्र आहे. मानवी समाजाच्या साकल्याने व सर्वांग परिपुर्ण अभ्यास करणा-या शास्त्राची उणीव भरुन काढण्याच्या प्रयत्नातूनच समाजशास्त्राचा उदय झाला. समाजाचा साकल्याने व सर्वांग परिपुर्ण अभ्यास करुन त्यासंबंधी सामान्य नियम प्रस्थापित करणारे जे शास्त्र ते समाजशास्त्र होय. भारतामध्ये समाजशास्त्राचा उदय सर्वप्रथम इ. स. १९१० मध्ये कलकत्ता विद्यापीठात झाला. कलकत्ता विद्यापीठात प्रो. ब्रजेद्रंनाथ सील व ए. आर. वाडिया यांच्या प्रयत्नाने समाजशास्त्र एक विषय म्हणून स्वतंत्रपणे अभ्यासण्यात आला. हाच भारतातील समाजशास्त्राचा औपचारिक उदय होय.

आज समाजविज्ञान विषयात अनेक संशोधन कार्ये पार पाडली जात आहे. याचा परिणाम समाजविज्ञान विषयात अनेक प्रकारचे वाचन साहित्य तयार होत आहे आणि ते कोणत्या न कोणत्या स्वरुपात समाजविज्ञान विषयक अभ्यासकांना, अध्यापकांना आणि संशोधकांकरिता ग्रंथालयाच्या माध्यमातून किंवा वेगवेगळ्या स्तरावर कार्यरत माहिती प्रणालीच्या माध्यमातून प्रलेखरुपात तसेच ईलेक्ट्रॉनिक स्वरुपात, डिजीटल स्वरुपात उपलब्ध होत आहे आणि या माहितीचा उपयोग संशोधक, अभ्यासक आणि अध्यापकवर्ग आपापल्या कार्यात करुन घेत आहे.

**ई-स्त्रोताची भूमिका -**

आज कोव्हिड १९ या महामारीमुळे शिक्षण क्षेत्रात अभ्यासक, अध्यापक आणि संशोधकांना समाजविज्ञान विषयातील विविध माहिती प्रणाली ऑनलाईन उपलब्द आहे. त्याच्या उपयोगाने देखील अभ्यासक, अध्यापक आणि संशोधक आपली माहिती विषयक गरज पुर्ण करु शकतो. अश्या काही माहिती प्रणाली आणि ई-स्त्रोताबद्दल आपण ओळख करुन घेऊ.

राष्ट्रीय समाज विज्ञान प्रलेखन केंद्र (National Social Science Documentation Centre - NASSDOC) - समाज विज्ञान शाखेतील संशोधन कार्याचा विकास करण्याकरिता १९६९ साली Indian Counsel of Social Science Research (ICSSR) या मंडळाची स्थापना करण्यात आली. या मंडळाच्या प्रयत्नाने भारतामध्ये समाज विज्ञान विषयांवरील निरनिराळ्या संशोधनासंबंधीत साहित्य एकत्रित करुन राष्ट्रामध्ये समाज विज्ञान शाखामधील सर्वच विषयांवर संशोधनास गती निर्माण करुन जगभरातील साहित्य एकत्रीत करण्याकरिता राष्ट्रीय समाज विज्ञान प्रलेखन केंद्राची (नॅसडॉक) स्थापना करण्यात आली.

नॅसडॉक या प्रलेखन केंद्राचा मुख्य उद्देश समाज विज्ञान शाखेतील प्रकाशित होणा-या सर्व छापिल, मुद्रित तसेच ई स्वरुपातील साहित्यांचा संग्रह करुन डेटाबँक तयार करणे व समाज विज्ञान शाखेतील सर्व उपभोक्त्यांना माहिती सेवा देणे.

**नॅसडॉक मधील विविध प्रकारचे वाचन साहित्य –**

ग्रंथसंग्रह, संदर्भ साहित्य, नियतकालिक साहित्य, प्रबंध आणि संशोधन अहवाल, मायक्रोफ़ॉर्म प्रलेख, आंतर-ग्रंथालय रिसोर्स सेंटर, युनियन कॅटलॉग ऑफ़ सोशल सायन्स जर्नल, युनियन कॅटलॉग ऑफ़ सोशल सायन्स सिरियल, युनियन कॅटलॉग ऑफ़ न्युजपेपर्स इन दिल्ली लायब्ररिज, डिरेक्टरि ऑफ़ प्रोफ़ेशनल ऑर्गनायझेशन ऑफ़ सोशल सायंटिस्ट, डिरेक्टरि ऑफ़ सोशल सायन्स रिसर्च इन्स्टिट्यूट्स ऑफ़ ऑर्गनायझेशन इन इंडीया, महात्मा गांधी ग्रंथसूची, रिटरोस्पेक्टीव्ह क्युमिलेटिव्ह इंडेक्स ऑफ़ इंडियन सोशल सायन्स पिरिऑडिकल्स तसेच भारतीय भाषेतील लेखांची सूची इ. मुद्रित वाचन साहित्यासोबतच https://icssr.org/nassdoc या संकेतस्थळावर समाज विज्ञान विषयातील विविध उपविषयांचा समावेश असलेले विविध प्रकारातील ई-स्त्रोत उपलब्ध आहेत.

नॅसडॉक प्रलेखन केंद्राच्या संकेतस्थळावर समाज विज्ञान विषयावरील उपलब्ध ई- स्त्रोतामध्ये अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, ग्रंथालय, महितीशास्त्र आणि तंत्रज्ञान, शिक्षणशास्त्र, या सर्व विषयावर उपलब्ध साहित्य जे – स्टोर, इंडीय स्टॅट, प्रोव्हस आय. क्यू., जे – गेट, या ई साधनाद्वारे उपलब्ध आहे, या साधनामध्ये ई-ग्रंथ, नियतकालिके, शब्दकोश, सार व निर्देश साहित्ये, सेमीनार, कॉन्फ़रन्स पेपर, फ़िल्मस, वेबसाईट्स असे विविध साहित्य उपलब्ध आहे.

या संकेतस्थळावर ई-स्त्रोता सोबतच विविध ई- सेवा उपलब्ध आहे. त्यासंदर्भात माहिती पुढील प्रमाणे आहे.

१.प्रलेखन, ग्रंथालय आणि संदर्भ सेवा, २. भारतीय आणि विदेशी सामाजिक विज्ञान पत्रिकांचे अप्रकाशित शोध प्रबंध, अनुसंधान परियोजना रिपोर्ट, ३. वर्तमान आणि प्राचीन साहित्यांचा संग्रह, ४. मागणीनुसार ग्रंथसुची व साहित्य शोध सेवा, ५. प्रचलित अद्ययावत सेवा, ६. प्रलेख आदानप्रदान सेवा, ७. आंतर ग्रंथालय लोन, ८. प्रतिरुप सेवा, ९. व्यावसायीक कौशल्य विकास व नेटवर्किंग, १०. विविध शैक्षणिक कार्यक्रम, ११. डिजीटल डेटाबेस, ऑनलाईन डेटाबेस आणि ऑफ़लाईन डेटाबेस मधून शोधप्रक्रिया, १२. भारतीय परिषदेकरिता समाज विज्ञान अनुसंधान संस्था आणि क्षेत्रिय केंद्रातर्फे ई-स्त्रोतांची पुर्ती करणे, १३. आय. सी. एस. एस. आर प्रकाशन विक्री व वितरण इ.

समाज विज्ञान विषयात अभ्यास करणा-या सर्व प्रकारच्या उपभोक्तांना संशोधन कार्य असो, अध्यापन कार्य असो अथवा अध्ययन कार्य असो अश्या सर्व कार्यात उपयुक्त असे ई साधने, ई-सेवा या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१. **ए. एम. यु. समाज विज्ञान सायबर ग्रंथालय (AMU Social Science Cyber Library) –**

अलीगड मुस्लीम विद्यापीठांतर्गत socsccybraryamu.ac.in या संकेतस्थळावर समाज विज्ञान विषयावर ई-साहित्य उपलब्ध असलेले ग्रंथालय आहे. अलीगड मुस्लीम विद्यापीठाचे डिन प्रा.शबहात हुसेन यांच्या नेतृत्वाखाली २७ डिसेंबर २०१३ साली भारताचे राष्ट्रपती श्री. प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते AMU Social Science Cyber Library या ऑनलाईन ग्रंथालयाचे उद्घाटन करण्यात आले. समाज विज्ञान विषयावरील सर्व वाचन साहित्य ऑनलाईन उपलब्ध करुन देणारे हे भारतातील सर्वात पहिले ऑनलाईन ग्रंथालय म्हणून ओळखले जाते. socsccybraryamu.ac.in या संकेतस्थळाच्या माध्यमातून समाज विज्ञान विषयावर विविध प्रकारचे ई-स्त्रोत उपलब्ध आहेत. समाज विज्ञान विषयाशी संबंधीत ईलेक्ट्रॉनिक स्वरुपात ई-बुक्स, ई-जर्नल्स, ई-थिसिस, ई-डाटाबेस, सब्जेक्ट गेट्वे च्या माध्यमातून विषयाशी संबंधीत लेख, सार, दृक-श्राव्य स्वरुपात भरपूर साहित्य संग्रहित असलेले हे एक ई-ग्रंथालय आहे. या ग्रंथालयाला आय. एस. ओ.९००१ : २००८ हे प्रमाणक लागू करण्यात आले आहे. हे ई-ग्रंथालय ऑनलाईन उपलब्ध असून उपभोक्त्यांकडून ई-स्त्रोत मिळविण्यासाठी कुठल्याही तऱ्हेचे शुल्क आकारले जात नाही. या ग्रंथालयाला लिमका बुक अवार्ड मिळालेला आहे. डी. ओ. ए. आर. आणि आर. ओ. ए. आर. या दोन ओपन एक्सेस डिरेक्टरिमध्ये या ग्रंथालयाची नोंद झालेली आहे. संशोधन आणि शिष्यवृत्ती साठी १३३ देशामध्ये सायबर प्रवेश केलेला आहे. अश्याप्रकारे या एकाच संकेतस्थळावर समाज विज्ञान विषयक विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक आणि इतर अभ्यासकांना या ई-ग्रंथालयाचा उपयोग करता येऊ शकतो.

AMU Social Science cyber Library या संकेतस्थळावर समाज विज्ञान विषयावरिल उपलब्ध ई-स्त्रोत पुढील प्रमाणे आहे. १. ई-पुस्तक २. ई-जर्नल्स – मोफ़त आणि सबस्क्राईब केलेले, ३.ई-शोधप्रबंध, ४. ई-डाटाबेस, ५. उपयुक्त संकेतस्थळ, ६. सब्जेक्ट गेट्वे, ७. दृकश्राव्य व्याख्यान, ८. इतिवृत्त - चर्चासत्र, ९. प्रकाशन इ. या ई- विषयातील ज्ञान उपलब्ध आहे.

२. **ई – पी.जी. पाठशाला -**

भारतामध्ये विविध विद्यापीठामधून विविध विषयावरिल जे अभ्यासक्रम राबविले जातात त्यातील ७२ विषयातील अभ्यासक्रमाचे साहित्य https://epgp.inflibnet.ac.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. या संकेतस्थळाच्या मदतीने आज समाजविज्ञान विषयातील अभ्यासक, अध्यापक आणि संशोधनकर्ता आपल्या माहितीविषयक गरजा सहज पुर्ण करु शकतो. या संकेतस्थळावर लेखस्वरुपात, दृकश्राव्य स्वरुपात साहित्य उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक विषयावरिल साहित्यासंदर्भात विविध इतर संकेतस्थळाबद्दल माहिती उपलब्ध करुन दिली आहे. या साहित्याचा उपयोग मुख्यता पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकणा-या विद्यार्थ्यांना होण्यास मदत होते.

**३. शोधगंगा –**

https://shodhganga.inflibnet.ac.in/ या ऑनलाईन संकेतस्थळावर भारतातील विविध विद्यापीठातून आचार्य पदवी प्राप्त संशोधन अहवाल इतर संशोधनकर्त्यांना त्यांच्या संशोधन कार्यात उपयोगी पडावे, त्याचप्रमाणे पुढील संशोधन कार्याला मार्गदर्शक ठरावे या उद्देशाने सर्व विषयांच्या संशोधन कर्त्यांना उपयोगी पडेल असे संशोधन अहवाल संकेतस्थळावर उपलब्ध आहे. या संकेतस्थळावर विषयानुसार, विद्यापीठानुसार संशोधन अहवालाचा शोध घेता येतो.

**४. शोधगंगोत्री –**

https://shodhgangotri.inflibnet.ac.in या संकेतस्थळावर भारतातील विविध विद्यापीठातील अनेक विषयावरील संशोधन आराखडा उपलब्ध आहे. या संकेतस्थळाच्या माध्यमाने संशोधक संशोधन कार्याचा आराखडा कसा तयार करावा, त्याचप्रमाणे आपापल्या विषयात कोणकोणत्या उपविषयावर इतर संशोधक कश्याप्रकारे अभ्यास करणार आहे, याबद्दल संशोधन आराखडा उपलब्ध आहे.

**निष्कर्ष –**

अशाप्रकारे असे विविध साहित्य साधने ऑनलाईन उपलब्ध असल्याने कोव्हिड १९ या महामारीमुळे लागलेल्या निर्बंधामुळे वाचन साहित्य मिळविण्याचे प्रत्यक्षमार्ग बंद झाले असले तरी माहिती तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ते मार्ग सर्वांसाठी खुले देखील आहे. त्यामुळे अश्याही परिस्थितित न घाबरता, न डगमगता सर्वांनी या परिस्थितीचा सामन करुन आपले कार्य सतत सुरु ठेवले पाहिजे जेणेकरुन हळूहळू परिस्थिती पुर्ववत होण्यास मदत होईल .

संदर्भसुची –

१. https://icssr.org/nassdoc
२. socsccybraryamu.ac.in
३. https://epgp.inflibnet.ac.in/
४. https://shodhganga.inflibnet.ac.in/
५. https://shodhgangotri.inflibnet.ac.in